दिनांक 18/12/ 2024 रोजीचा प्रशासकीय ठराव क्रमांक 148

**विषय** –विटा शहर दुसरी सुधारित विकास योजना मधील रि.स. नं. 805/4/1 सि.स.नं.3078 मधुन प्रस्तावित 12 मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याच्या आखणीत बदल करणेबाबत.

**संदर्भ** -1 श्री.हणमंतराव भीमराव सपकाळ व श्री. सदाशिव भीमराव सपकाळ यांचा रिसनं. 805/4/1 सि.स.नं. 3078 मधुन प्रस्तावित 12 मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याच्या आखणीत बदल करून मिळणेबाबतचा दिनांक 29/01/2021रोजीचा अर्ज.

2. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 51 दिनांक 20/08/2021
3. मा.सहसंचालक नगर रचना,पुणे विभाग यांनी जा.क्र.वि.यो.विटा / स.नं.805/4/1/सहसंपुवि /69 दिनांक 15/01/2024 ने दिलेली मान्यता.
4. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील तरतूद क्रमांक 3.11
5. रचना सहायक, सहाय्यक नगररचनाकार व मुख्याधिकारी विटा नगरपरिषद यांची दिनांक 10/10/2024 रोजीची मंजूर कार्यालयीन टिप्पणी

विटा शहराची सुधारित आराखडा विकास योजना (दुसरी सुधारित) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने क्र.टी.पी.एस-2009/1138/CR-1964/युडी-13 दि.31/08/2009 अन्वये मंजुर केली असुन, दिनांक 31/10/2009 पासून अंमलात आलेली आहे. आणि ज्याअर्थी, विटा शहर मंजूर विकास योजनेमध्ये रि.स. नं. 805/4/1 सि.स.नं. 3078 मधुन 12 मी. रुंदीचा दक्षिण उत्तर चालीचा विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे. श्री. हणमंतराव भीमराव सपकाळ व श्री. सदाशिव भीमराव सपकाळ यांची प्रस्तावित 12 मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्यात मंगल कार्यालय (नगरपरिषद जुना मिळकत क्रमांक 5511), पोल्ट्री शेड(नगरपरिषद जुना मिळकत क्रमांक 5508, 5509 व 5510 ) व एम.एस.ई.बी. कडील एचटी व 360 के.व्ही. लाईन ने बाधित होत असलेने अर्जदार यांनी रस्ता वळवणे बाबत मागणी अर्ज दिनांक 29/01/2021 रोजी केला आहे. त्यानुसार मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 51 दिनांक 20/08/2021 ने मंजूरी दिली आहे. तसेच दिनांक 01/02/2022 चे नोटरी हमीपत्राद्वारे श्री. हणमंतराव भीमराव सपकाळ व श्री. सदाशिव भीमराव सपकाळ यांनी मागणी प्रमाणे रस्त्याच्या आखणीत बदलून दिलेस प्रस्तावित विकास योजना रस्त्याची जागा नगरपरिषदेला मोफत देऊ व रस्ता वापर वहिवाटीसाठी त्वरित खुला करून देऊ असे लिहून दिले आहे. मा. सहसंचालक नगर रचना, पुणे विभाग पुणे यांनी जा.क्र. वि.यो.विटा/स.नं.805/4/1/सहसंपुवि/69 दिनांक 15/01/2024 अन्वये स.नं. 805/4/1 व सि.स.नं. 3078 मधून जाणारा उत्तर-दक्षिण तिरकस प्रस्तावित 12.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या आखणीत बदल करून अर्जदार यांच्याच मालकीच्या स.नं. 805/4/1 व सि.स.नं. 3078 मधील जागेत मूळ स्थानापासून सुमारे 30 मी.पश्चिमेस सरळ (उत्तर-दक्षिण) दिशेत स्थलांतरित

करून पुढे 12.0 मी. रुंदीच्या, पूर्व-पश्चिम प्रस्तावित विकास योजना रस्त्यास जोडून तसे प्रस्तावित करण्याच्या सवलतीस मान्यता दिलेली आहे.

तरी मा. सह. संचालक नगर रचना पुणे, विभाग पुणे यांचेकडील संदर्भिय पत्र क्र.3 च्या अनुषंगाने व रचना सहायक, सहाय्यक नगररचनाकार व मुख्याधिकारी विटा नगरपरिषद यांची दिनांक 10/10/2024 रोजीची मंजूर कार्यालयीन टिप्पणी नुसार सदर रस्त्याच्या आखणीत बदलाचा आदेश पारित करणेस अंतिम मान्यता देणेत येत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
(डॉ विक्रम बांदल)
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा